# सेंट लुईस मराठी मंडळाचे
## आगळे मदतकार्य

३ ऑगस्ट २०१२ची दुपारची वेळ. स्वातीचा (माझी पत्नी) फोन आला,"अरे पराग आताच मला फोन आला. तू मेगाबस अपघाताबद्दल ऐकलंस का? आदिती आव्हाड नावाची मुलगी त्या अपघातात गेली, आणि तिचे आई, वडील जखमी आहेत. त्यांना मदत हवी आहे. आणि मराठी मंडळ मदत करू शकेल का म्हणून विचारलंय." बातमी ऐकूनच डोकं सुन्न झालं. एक मराठी मुलगी आणि तिचे पालक ह्यांच्याबरोबर असं व्हावं.. तेही एका परक्या देशात.. स्वाती आणि मी बोलतानाच भावनाविवश झालो. जरी आम्ही त्या कुटुंबीयांना ओळखत नसलो तरी! आम्ही ठरवलं मराठी मंडळाच्या कार्यकारिणीशी बोलून, ही माहिती मंडळाच्या सद्य अध्यक्षा उत्पला शेलार ह्यांच्याकडे पाठवावी. एवढ्या अवधीत उत्पला शेलार ह्यानाही बरेच फोन येऊन गेले, ही बातमी सेंट लुईसमधील बऱ्याच भारतीयांपर्यंतही पोहोचली. ईमेल, फोनच्या माध्यमातून विचारपूस सुरू झाली आणि ह्या सगळ्यामागे एकच भावना होती, ती म्हणजे ह्या अपघातग्रस्त कुटुंबाला मदत करण्याची. मदतीचा ओघ वाहण्यास तयार होता. गरज होती ती ह्या ओघाला दिशा देण्याची!

सेंट लुईस मराठी मंडळाच्या अध्यक्षा उत्पला शेलार आणि मी ह्या बाबतीत चर्चा केली आणि मग त्यादृष्टीने मराठी मंडळाने ह्या मदतीसाठी पुढाकार घेतला. ह्या सगळ्या बाबतीत महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे ही मदत आणि ह्या मदतीचे मध्यवर्ती केंद्र कसे बनवावे. ज्यामुळे सर्वांना माहिती आणि काय मदत अपेक्षित आहे ते कळेल. मराठी मंडळाच्या कार्यकारिणीमधे निर्णय घेण्यात आला की ह्या सर्व मदतीची जबाबदारी मी आणि माझी पत्नी स्वाती हे सांभाळतील. कारण ह्या सगळ्या कार्यात महत्त्वाचं होतं की एक मध्यवर्ती केंद्र, मध्यवर्ती व्यक्ती, ज्याच्यासोबत संपर्क साधून आव्हाड कुटुंबीयांना योग्य ती मदत करता येईल.

इंटरनेटच्या युगात आपल्याला उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा वापर करण्याचा आम्ही निर्णय घेतला. गूगल डॉक्स वरून उपलब्ध असणारी एक्सेल ही सुविधा घेवून एक मध्यवर्ती सूचना केंद्र आणि योजनाकेंद्र बनवले गेले. मराठी मंडळाच्या सदस्यांची यादी त्यांना ह्या पुढाकाराची आणि हव्या असलेल्या मदतीसाठी वापरण्यात आली. ह्या सगळ्या मदतीमधे सेंट लुईस मधील तेलगु मंडळ, भारतीय मंडळाचे सदस्य सुद्धा मागे नव्हते. त्या मंडळांच्या सदस्यांची यादी सर्वांना माहिती देण्यासाठी वापरली गेली. ह्या मध्यवर्ती योजनाकेंद्राद्वारे ज्या प्रमाणे मदतीची गरज होती ती माहिती टाकल्या जात होती. आणि महत्त्वाचे म्हणजे आव्हाड कुटुंबास आवश्यक अशी, जशीजशी माहिती येत होती त्याप्रमाणे ती माहिती आम्ही इतरांपर्यंत पोहोचवत होतो.

सुरुवातीचे काही आठवडे जरा कठीण होते कारण भावनात्मक दृष्ट्या सर्वांसाठीच कठीण होतं. आपण ज्यांना ओळखत नाही, अशा कुटुंबीयांना योग्य ती मदत कशी करावी हा प्रश्न सर्वांनाच होता. त्यातही सगळ्यात कठीण होतं, आव्हाड कुटुंबीयांसाठी! परक्या देशात, दुःखाचे आभाळ कोसळल्यावर स्वतःला सावरून त्यांनी मदतीला येणाऱ्या सर्वांचे स्वागत केले. ह्या सर्व मदतीच्या ओघात आव्हाड कुटुंबीयांचा एकंदर दृष्टिकोन, खंबीर वृत्ती, आणि सगळ्यांना आपलासा करण्याचा स्वभाव ह्या गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. त्यांना दररोज जेवण घेवून जाणे, त्यांच्या दररोजच्या गरजांची विचारपूस करणे, त्यांना गरज असलेल्या ठिकाणी घेवून जाणे, दवाखान्याच्या एका विभागातून दुसऱ्या विभागात गरज असल्यास घेवून जाणे ह्या गोष्टी सर्वांनी बिनबोभाट केल्या. डॉक्टर शितुत ह्यांनी आव्हाड काका आणि काकूंच्या जखमा ठिक होईपर्यंत काळजी घेतली, त्यांच्या क्षेत्रातील डॉक्टरांची नियमित भेट घेवून त्यांच्या एकंदरित परिस्थितीची माहिती ठेवली. त्यांनी आव्हाड काकू भारतात गेल्यावर त्यांच्या माहितीतील डॉक्टर सुचवले, ते येथे असताना त्यांना लागणाऱ्या कायदेशीर मदतीसाठी वकील सुचवले.

लाहोटी, बागवे आणि साठे दांपत्यांनी पहिल्यांदा दवाखान्यात जावून परिस्थितीचा आढावा घेतला. आव्हाड काकांना पहिल्या आठवड्यात बागवे आणि लाहोटी दांपत्यांनी आपुलकीने घरी आणून त्यांची विचारपूस केली आणि त्यांना हवी ती मदत केली जी भावनिक दृष्ट्या फार महत्वाची होती. खरं सांगायचं झालं तर हा लेख मदत करणाऱ्यांची नावे घेतली तर अपुरा पडेल. ह्या सर्व कार्यात कित्येक मदतगार होते ज्यांनी काहीही न सांगता त्यांच्या वेळेनुसार हवी ती मदत केली. मराठी मंडळाच्या सदस्यांनी केलेली मदत आव्हाड काका आणि काकूंच्या शब्दातच वर्णन करतोय.

"मला दवाखान्यात नेहमी सगळे विचारतात की आम्ही एवढ्या लोकांना सेंट लुईसमधे कसे ओळखतो कारण दवाखान्यातील लोक प्रत्येक दिवशी आम्हाला सकाळ संध्याकाळ कुणीतरी नवीन लोक भेटायला आलेले दिसतात. आम्ही त्यांना सांगतो की आम्ही कुणाला ओळखत नाही. पण ह्या सगळ्या परिस्थितीत सगळ्यात चांगली गोष्ट झाली, नव्या ओळखी, जुळलेली नवी नाती."

अतीदक्षता विभाग ते पुनर्वसन केंद्र ते दवाखान्याची खोली हा प्रवास सोपा नव्हता. पण सुकर झाला केवळ सर्व सदस्यांच्या मदतीच्या भावनेने! मंडळाच्या सदस्यांच्या मदतीमागे एकच भावना होती की, आपण आव्हाड कुटुंबाचं दुःख कमी करू शकणार नाही, पण आपण एवढं करू शकतो की, ज्यामुळे आव्हाड कुटुंबाचा सेंट लुईस मधील मुक्काम तरी सुखकर होईल आणि आव्हाड काकूंची तब्येत लवकर चांगली होवून त्यांना भारतात परत जाता येईल. आव्हाड काकूंना पुनर्वसन केंद्रात नेहमी पलंगावर झोपलेल्या पाहिलेल्यांनी जेव्हा त्यांना खुर्चीवर बसलेले पाहिले त्यावेळी झालेला आनंद विरळाच! प्रत्येक आठवड्यात होणारी काकूंची सुधारणा मराठी मंडळाच्या सदस्यांना सुखावून जात होती.

आजही हा लेख लिहिताना, सेंट लुईस मराठी मंडळाने केलेल्या मदतीचा, एकंदर परिश्रमांचा आणि आम्ही हे मदतकार्य कसं साध्य केलं ह्याचा विचार केला तर, काही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात. अशा परिस्थितीत आर्थिक मदत मिळवणे बऱ्याचदा सोपं असतं. परंतु सर्वांना संघटित करणे, मदतीच्या ओघाला दिशा देणे, स्वयंसेवकांचा ह्या कार्यासाठी वेळ मिळवणे हे निर्णायक विचार करण्याचे मुद्दे आहेत.

प्रथम हे कार्य खरोखरच अशक्य वाटत होतं. परंतु योग्य योजनाबद्धता, छोट्या तुकड्यामधे कामाची विभागणी आणि सुरुवातीला, अल्प मुदतीच्या गरजेचा विचार ह्यांनी हे काम सुकर केले आणि अखेरीस एवढे दीर्घ मदतीचे कार्य पार पडले. ह्या सर्व कामात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे फक्त मराठी भाषकच नव्हे तर सर्व भारतीयांच्या मदतीचा ओघ हा फार मोलाचा होता.

आव्हाड काकूंना जेव्हा डॉक्टरांनी भारतात जाण्याची परवानगी दिली, तेव्हा त्यांना भेटून जाणाऱ्यांची संख्याच आव्हाड दाम्पत्याने सर्वाना लावलेला जिव्हाळा सांगून गेली. 'तब्येत चांगली झाल्यावर परत येवूत' हे आश्वासन आव्हाड कुटुंबीयांनी सर्वाना दिले. त्यांची आदितीच्या स्मृतीप्रित्यर्थ मिसोरीच्या कोलंबिया विद्यापीठात शिष्यवृत्ती सुरू करण्याची योजना सांगितली. विमानतळावर त्यांना सोडायला आलेले सेंट लुईसकर आणि आव्हाड दांपत्य ह्या सर्वांच्या डोळ्याच्या ओल्या पात्या खूप काही सांगून गेल्या. अडीच महिन्यांपूर्वी एकमेकांना अनोळखी असलेल्यांचा जिव्हाळा वेगळाच होता! सेंट लुईस मराठी मंडळ तर सर्वांच्या स्वागतासाठी सदैव उत्सुकच असते. परंतु आपल्या भारतातून अमेरिकेत, आपल्या गांवात आलेल्या अनोळखी दाम्पत्याचे दुःख हलके करण्यासाठी सेंट लुईस मराठी मंडळाने दाखवलेल्या मायेचा ओलावा विरळाच!

**- पराग कोल्हे** (सेंट लुईस, मिसोरी)